# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 11/06/2021 (शुक्रवार)

(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावर मेनरोड दोडकीपूरा काटोल येथे दि. 09/06/2021 चे 21.00 वा. ते दि. 10/06/2021 चे 03.00 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– गौरव धनराज खंते, वय 23 वर्ष, रा. मेन रोड दोडकीपूरा काटोल याने आपली एमएच– 49/एएम– 4663 कमांकाची बूलेट गाडी घरासमोर उभी करून ठेवली व जेवन खावन करून झोपी गेले. त्यानंतर फिर्यादी हा दि 10/06/21 रोजी 03.00 वा. सुमारास उठून पाहीले असता बूलेट गाडी किंमती 85,000/– रूपयाची रात्री दरम्यान दिसून आली नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादी एमएच– 49/एएम– 4663 कमांकाची बूलेट गाडी चोरून नेली. तपासा दरम्यान आरोपी नामे– अजय प्रकाश भागवतकर वय 22 वर्ष रा चिखली कलमना मार्केट रेल्वे टेशन जवळ नागपूर हा निष्पन्न झाल्याने आरोपीला अटक करण्यात आली आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथ आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अरूण भेंडे मो नं 9923193642 हे करीत आहे.

### गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावरील सटवा माता मंदीर जवळ येथे दिनांक 09/06/2021 चे 12.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुधाकर केशवराव बागडे, वय 62 वर्ष, रा. सटवामाता मंदीर सावनेर, वार्ड क 5 यांच्या घरा समोर आरोपी नामे– 1) मनिलाल खोब्रागडे, 2) सौ. सविता मनिलाल खोब्रागडे, रा. दोन्ही सर्वोदय नगर पाण्याची टाकी जवळ सावनेर 3) सौ. शारदा ढोके, 4) सौ. सुशिला अर्जून पाटील, 5) गगन अर्जून पाटील, 3 ते 5 रा. बजाज कॉलोनी वाघोडा ता.सावनेर व 6) सौ. किरण गोलाईत, रा. गुजरखेडी झोपडपट्टी ता. सावनेर असे येवून त्यांनी गैरकायदयाची मंडळी गोळा करून जुन्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादी सोबत भांडण करून अश्लील शब्दात शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम 143, 294, 506 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास स.फौ राजेन्द्र यादव मो नं. 9423602987 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावरील सुतगिरणी फाटा मोहगाव येथे दिनांक 09/06/2021 चे 22:00 वा. ते 22.45 वा. दरम्यान फिर्यादींचा मुलगा नामे– महेश विलास कुहीटे, वय 20 वर्ष हा घरून एमएच–40/बीवाय 3604 कमांकाच्या हिरो होन्डा स्प्लेंडर प्लस मोटारसायकल घेउन नागपूरला काही कामानिमित्य त्याचे दोन मित्रांसह गेला होता. तो नागपूर वरून अंदाजे 22.00 वा. निघुन त्याचे मित्र वैभव राजु हिंगणे वय 22 वर्ष व आशिष गजानन चिचघरे वय 21 वर्ष असे तिघे मिळून टिबलसिट नागपूर वरून बुटटीबोरी येथे जात असता मोहगांव सुतगिरणी फाटयासमोर अज्ञात वाहन चालकाने मोटरसायकला मागून धडक दिली. या अपघातात फिर्यादीचा मुलगा व त्याचे मित्र मोटरसायकलसह खाली पडल्याने वैभव राजु हिंगणेकर याच्या हातापायाला व

डोक्याला गंभीर मार लागल्यामुळे तो घटनास्थळी मरण पावला व महेश कुहीटे त्याचा मित्र आशिष चिचघरे यांना डोक्याला व हातापायाला गंभीर दुखापत असल्याने त्यांचा माया हॉस्पीटल बुटटीबोरी येथे उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी नामे– विलास रामभाउ कुहिटे, वय 48 वर्ष, रा. नविन वसाहत तुरकमारी त.हिंगणा जि.नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि आरती उघडे मो.क्र 8355947473 या करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील सावनेर ते खापा रोड कोदेगाव शिवार येथे दिनांक 10/06/2021 चे 14:30 वा. दरम्यान आरोपी नामे– आदेश विजय निकोसे वय 26 वर्षे रा. कोथुर्ना (मृतक) याने त्याचे ताब्यातील एम.एच–40/बि.पी–6174 क्रमांकाचा हिरो एच.पी.डीलेक्स मोटरसायकल ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित नेवुन रोडवर स्लिप होवुन जखमी झाला. त्याला उपचाराकरीता ग्रामीण दवाखाना सावनेर येथे नेले असता वैदयकीय अधीकारी यांनी तपासुन मृत घोषीत केले. सदर अपघातास व मृत्युस नमुद मोटार सायकल चालक आरोपी हा कारणीभुत झाल्याने सदर गुन्हा नोद.

सदर प्रकरणी नामे– ग.भा. लताबाई विजय निकोसे वय 26 वर्षे रा. कोथुर्ना यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गंगाधर ठाकरे मो नं 9923908382 करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर